महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

शनिवार ❖ ०५ ऑक्टोबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १०२ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# कॅबिनेट बैठकीत लाडकी बहीण योजनेला पुन्हा मुदतवाढ

## जनविकासाच्या तब्बल ४१ निर्णयांना मंजुरी

**राज्य मंत्रिमंडळातील संक्षिप्त निर्णय**

- राज्यातील अकृषिक कर पूर्णपणे माफ होणार
- महसूल न्यायाधीकरणाच्या अध्यक्ष व सदस्यांसाठी जाहिरातीद्वारे अर्ज मागवणार
- दौंड येथे बहुउद्देशीय सभागृह नाट्यगृहासाठी शासकीय जमीन
- त्र्यंबकेश्वर तालुक्यातील किकवी प्रकल्पाच्या कामास मान्यता
- टेंभू उपसा सिंचन योजनेस स्व. अनिल भाऊ बाबर यांचे नाव
- पूर्णा नदीवर दहा सारवळी बंधाऱ्यांच्या कामांना गती देणार सिल्लोड मधील जमिनीला सिंचन
- प्राचीन व ऐतिहासिक वास्तूंचे नुकसान केल्यास आता दोन वर्षांचा तुरुंगवास, एक लाख दंडाची तरतूद

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**□ प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक तोंडावर येऊन ठेपली आहे. येत्या काही दिवसात विधानसभा निवडणुकांची घोषणा होईल, असे म्हटले जात आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी राज्य सरकारकडून अनेक महत्त्वाच्या निर्णयांना हिरवा कंदील दाखवण्यात येत आहे·



आता नुकतंच राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत सरकारने तब्बल ४१ निर्णयांना मंजुरी दिली आहे. यात राज्य सरकारने कोळी बांधवांसाठी एक मोठा निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत राज्य सरकारकडून अनेक महत्त्वांचे निर्णय घेण्यात आले. या बैठकीत कोळी बांधवांसाठी एक मोठा निर्णय घेण्यात आला. राज्य सरकारकडून लवकरच आणखी एका महामंडळ स्थापन करण्यात येणार आहे. नुकतीच या महामंडळाला मंजुरी देण्यात आली आहे. सरकारने मच्छिमार आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. गोड्या पाण्यातील मच्छिमारांसाठी तसेच सागरी मच्छिमारांसाठी महामंडळ स्थापन करण्यात येणार आहे.

**कोळी बांधवांकडून निर्णयाचे स्वागत**

या निर्णयानंतर कोळी बांधवाकडून ढोलताशा वाजवून जल्लोष केला जात आहे. भाजप कार्यालयासमोर अनेक कोळी बांधवांनी एकत्र येत जल्लोष साजरा केला. यावेळी त्यांनी पारंपरिक ढोलताशा वाजवून आनंद साजरा केला.

**लाडकी बहीण योजनेलाही मुदतवाढ**

तसेच राज्य सरकारकडून लाडकी बहीण योजनेलाही मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे लाखो महिलांना दिलासा मिळाला आहे. तसेच गड किल्ल्यांवर दारु, ड्रग्ज घेतल्यास २ वर्षांची शिक्षा आणि १ लाख दंड आकारला जाणार आहे. आजच्या कॅबिनेट बैठकीत तब्बल ४१ निर्णयांना मंजुरी देण्यात आली आहे.

# राज्यपाल नियुक्त १२ जागांसाठी मोर्चेबांधणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**महाविकास आघाडी सरकारच्या काळापासून रखडलेल्या राज्यपाल नामनिर्देशीत १२ आमदारांच्या नियुक्तीला मुहूर्त लागण्याची चिन्हे दिसत आहेत. त्यामुळे अनेकांच्या स्वप्नांना पुन्हा धुमारे फुटले आहेत. या नियुक्ती करताना अर्थातच मर्जीतील कार्यकर्ता, पदाधिकारी, सामाजिक, जातीय समि?करणांचा विचार होणार, काहींची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न होणार हे निश्चित आहे. विधानसभेच्या तोंडावरच १२ आमदारांच्या नियुक्तीचा मुहूर्त साधल्या जात असल्याने त्यातून काय संदेश सरकारला द्यायचा हे स्पष्ट आहे.**

**प्रलंबित आमदारकीला विधानसभेचा मुहूर्त**

राज्यपाल नियुक्त १२ जागांचा मुद्दा गेल्या चार वर्षांपासून अडगळीत पडला होता. महाविकास आघाडीने जून २०२० मध्ये १२ आमदारांच्या नियुक्तीची शिफारस केली होती. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी त्याला काही हिरवा कंदिल दाखवला नाही. त्यांनी नियुक्त्या दिल्या नाहीत. कोश्यारी यांनी मुद्दामहून अडवनूक केल्याचा आरोप करत कोल्हापूर येथील सुनील मोदी यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली होती. राज्यात जुलै २०२२ मध्ये सत्ता परिवर्तन झाले. महायुतीचे सरकार आले. आधीच्या आमदारांची यादी बारगळली. आता विधानसभा निवडणुकीच्या अगोदर हा मुद्दा धसास लावण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

राज्यपाल नियुक्त १२ जागांसाठी एकनाथ शिंदे गटाने महायुतीत आघाडी घेतली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पक्षाने त्यांच्या ५ इच्छुकांची नावे भाजप पक्ष श्रेष्ठींकडे पाठवली आहे. यामध्ये अनेकांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. लोकसभेला ज्यांना डावलण्यात आलं. ज्यांचं तिकीट कापण्यात आलं. त्यांच्या नावाला प्राधान्य देण्यात आल्याचं दिसून येते. तर ज्यांना महामंडळ देण्याचे आश्वासन देण्यात आले, त्यांची पण वर्णी लावण्यात येत आहे. विधानसभा निवडणुकीसाठी इच्छूक पण ज्यांना उमेदवारी देणे अडचणीचे आहे, त्यांची या आमदारकीवर बोळवण करण्यात येणार आहे. शिंदे गटाने जी नावं पुढं केली आहेत, त्यात मनीषा कायंदे, रविंद्र पाठक, चंद्रकांत रघुवंशी, हेमंत पाटील आणि संजय मोरे या पाच जणांची नावं असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. अधिकृतपणे अजून पक्षाने याविषयीची माहिती दिलेली नाही. लवकरच यासंबंधीचा निर्णय महायुतीमधील तीनही पक्ष जाहीर करू शकतात.

# निवडणुकीची घोषणा दसऱ्यानंतर!

राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सर्वच राजकीय पक्षांनी या निवडणुकीसाठी कंबर कसली असून जोरदार तयारी सुरू केली आहे. अशामध्ये विधानसभा निवडणुकीची आणि आचारसंहितेची तारीख कधी जाहीर होणार असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या टीमने मागच्या आठवड्यात महाराष्ट्रात येऊन पाहणी केली. त्यामुळे लवकरच तारीख जाहीर होईल असे म्हटले जात होते. पण आता महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची घोषणा १३ ऑक्टोबरनंतर होण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ८ ऑक्टोबरला हरियाणा आणि जम्मू काश्मीरच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर होणार आहेत. तर १० ऑक्टोबरला हरियाणा- जम्मू काश्मीर निवडणूक कार्यक्रम संपणार आहे. नियमानुसार एक निवडणूक कार्यक्रम संपण्याशिवाय दुसऱ्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करता येत नाही. निवडणूक तारखा जाहीर करण्यापूर्वी निवडणूक आयोगाला तयारी करावी लागते.

१२ ऑक्टोबरला शनिवार आणि १३ ऑक्टोबरला रविवार आहे. त्यामुळे १३ तारखेनंतर विधानसभा निवडणूक तारीख आणि आचारसंहितेची घोषणा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यात २६ नोव्हेंबर २०२४ रोजी विधानसभेची मुदत पूर्ण होत आहे. या मुदती आधी राज्यात विधानसभा निवडणूक होणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन निवडणूक आयोग कामाला लागले आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर साधारणता ४५ दिवसांनी नवीन विधानसभेची स्थापना होणे अपेक्षित असते. अशामध्येच २७ सप्टेंबरला केंद्रीय निवडणूक आयोगाची टीम महाराष्ट्रात आली होती.



# एसटी बसमध्ये आता 'शिवनेरी सुंदरी'

## भरत गोगावलेंनी घेतलेला निर्णय नेमका आहे तरी काय?

मुंबईः मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या एसटीच्या ई-शिवनेरी बसमध्ये प्रवाशांना मदत करण्यासाठी हवाई सेवेच्या धर्तीवर आदरातिथ्य व्यवस्थापनाची सेवा देणारी परिचारिका (शिवनेरी सुंदरी) नेमण्यात येणार असून, प्रवाशांच्या तिकिटावर कोणताही अधिभार न लावता प्रवाशांना चांगल्या सेवा सुविधा देऊन गुणात्मक सेवेचा दर्जा उंचावेल अशी अभिनव योजना भविष्यात सुरू करण्यात येणार आहे.अशी माहिती एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी महामंडळाच्या ३०४ व्या बैठकीमध्ये दिली.एसटी महामंडळाचे नवे अध्यक्ष भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली ३०४ वी संचालक मंडळाची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये विविध खात्याच्या तब्बल ७० पेक्षा जास्त विषयांवर चर्चा होऊन त्यांना मान्यता देण्यात आली. त्यापैकी, मुंबई-पुणे मार्गावर धावणाऱ्या ई-शिवनेरी बसमध्ये प्रवाशांना मदत करण्यासाठी परिचारिका नेमण्यास मान्यता देण्यात आली.

**आनंद आरोग्य केंद्र**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील स्वर्गीय आनंद दिघे यांच्या स्मरणार्थ एसटीच्या ३४३ बस स्थानकांवर 'आनंद आरोग्य केंद्र' या नावाने दवाखाना सुरू करण्यात येणार असून, अत्यंत माफक दरामध्ये बस स्थानकांवरील प्रवाशां बरोबरच आसपासच्या सर्व नागरिकांना कमी दरामध्ये विविध आरोग्य चाचण्या व औषधे एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी संबंधित संस्थांना बसस्थानकांवरील ४०० ते ५०० चौ.सेमी. ची जागा उपलब्ध करून देण्यात येईल. तेथे त्या संस्थेने आरोग्य तपासणी दवाखाना, पॅथॉलॉजी लॅब व औषध दुकान सुरू करून सेवा द्यावयची आहे.

**मूल व धारणी येथे नवे आगार निर्माण होणार**

चंद्रपूर जिल्ह्यातील मूल व अमरावती जिल्ह्यातील धारणी या आदिवासी बहुल प्रदेशांमध्ये एसटीचे नवे आगार निर्माण करण्यात येणार असून या आगाराच्या निर्मितीनंतर एसटीच्या एकूण आगारांची संख्या २५३ होणार आहे.प्रत्येक बस स्थानकांवर महिला बचत गटांना स्टॉल उघडण्यास जागा एस. टी. महामंडळाच्या प्रत्येक बस स्थानकांवर त्या परिसरातील महिला बचत गटांना आपले स्थानिक पदार्थ विक्री करण्यासाठी चक्रीय पद्धतीने नाममात्र भाडे आकारुन१०x१० आकाराचा स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहे.उपरोक्त निर्णयाबरोबरच नवीन २५०० साध्या बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू करणे तसेच १०० डिझेल बसेसचे प्रायोगिक तत्त्वावरील इलेक्ट्रिक बसमध्ये रूपांतर करणे अशा विविध विषयांना या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली.

या बैठकीला एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार व एसटी महामंडचे सर्व खाते प्रमुख उपस्थित होते.

# वाहतूककोंडीने कल्याणकर नागरिक हैराण

### सायंकाळी बाहेर पडू नका

### दुर्गाडीला येण्यासाठी ओला टॅक्सी-रिक्षाचा वापर करा

### वाहतूक पोलिसांचा कल्याणकरांना आवाहन



कल्याण : सायंकाळच्या वेळी शक्यतो बाहेर पडू नका आणि दुर्गाडी किल्ल्यावर दर्शनासाठी स्वतःच्या वाहनाऐवजी रिक्षा किंवा ओला टॅक्सीचा वापर करण्याची विनंती कल्याण शहर वाहतूक शाखेच्या पोलिसांकडून कल्याणकरांना करण्यात आली आहे. नवरात्रौत्सवाच्या पहिल्याच दिवशी सकाळी आणि सायंकाळी झालेल्या वाहतूक कोंडीमुळे कल्याण पश्चिमेतील मुख्य रस्ते अक्षरशः ठप्प पडलेले पाहायला मिळाले. या पार्श्वभूमीवर कल्याण शहर वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश शिरसाठ यांनी कल्याणकरांना हे आवाहन केले आहे.

दुर्गाडी किल्ल्यावरील नवरात्रौत्सवामुळे पुढील ९ दिवस गोविंदवाडी बायपास हा सायंकाळी ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. परिणामी या मार्गावरील वाहतूक ही पत्रीपुल, बैलबाजार, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सहजानंद चौक, लालचौकी मार्गे दुर्गाडी चौक अशी सुरू आहे. मात्र या मार्गावर प्रचंड मोठ्या संख्येने वाहने आल्यामुळे कल्याण शहरातील आग्रा रोडवर वाहतुकीचा प्रचंड ताण आला आहे. ज्यामुळे कल्याण पश्चिमेतील या मुख्य मार्गावर सकाळ पाठोपाठ सायंकाळीही अभूतपूर्व अशी वाहतूक कोंडी झाली.

ही वाहतूक कोंडी विचारात घेऊन कल्याण शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश शिरसाठ यांनी नागरिकांना विनंती वजा आवाहन केले आहे. नागरिकांनी सायंकाळच्या वेळी शक्यतो बाहेर पडू नये, जेणेकरून ते कोणत्याही वाहतूक कोंडीमध्ये अडकणार नाहीत. दुर्गाडी किल्ल्यावरील देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी स्वतःचे वाहन आणू नये. त्याऐवजी ऑटो रिक्षा किंवा ओला टॅक्सीचा वापर करावा. दरम्यान वाहतूक पोलिसांनी केलेल्या या आवाहनाला नागरिक प्रतिसाद देणार का ? आणि हे आवाहन करण्यापलिकडे वाहतूक पोलिसांकडे इतर कोणतेही पर्याय उपलब्ध नाहीत का? सण - उत्सव काळात होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन प्रशासकीय यंत्रणा आता तरी ठोस उपाययोजना करणार का ? असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाले आहेत.

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा लाभ घेण्यासाठी ४ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करावेत



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) –**

ठाणे : वय वर्ष ६५ व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांनी 'मुख्यमंत्री वयोश्री' योजनेचा लाभ घेण्यासाठी ४ ऑक्टोबर २०२४ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केले आहे.

राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानापरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने / उपकरणे खरेदी करण्याकरिता तसेच मनःस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र इ. द्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवता यावे, यासाठी राज्यात 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

आगामी विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने राज्यात लवकरच आदर्श आचारसंहिता लागू होण्याची शक्यता असल्याने, योजनेचा लाभ मिळण्यासाठीचे अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख दि.४ ऑक्टोबर २०२४ पर्यंतच आहे. त्यानुसार पात्र ज्येष्ठ नागरिकांनी उद्या शुक्रवार दि.४ ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाकडून करण्यात आले आहे.

# ३ री माळ : श्री चंद्रघंटा



*मातेचं तृतीय रूप आहे 'चंद्रघंटा'. या रूपात देवीची आराधना केल्यामुळे आपलं मन सजग होऊन भावनांवर नियंत्रण मिळवता येतं. खंबीरपणा वाढीस लागतो. आपले व्यक्तिमत्व सुधारण्यास मदत होते. 'चंद्रघंटा' नावाप्रमाणेच शांतचित्त आणि आत्मबळ प्रदान करणारी आहे.दुर्गा देवीचे हे तिसरे स्वरूप शांती देणारे आणि कल्याणकारी आहे. देवीच्या मस्तकावर घंटेच्या आकाराचा अर्धचंद्र आहे म्हणून या रुपाला 'चंद्रघंटा' असे म्हणतात. देवीच्या कृपेमुळे साधकांना अनेक अमूल्य वस्तू मिळतात, अनेक पवित्र ध्वनी ऐकू येतात असं सांगितलं जातं. या देवीच्या पुजेने आपल्या अंगी आत्मविश्वास येतो, भीती नाहीशी होते आणि विनम्रता येते. 'चंद्रघंटा' देवीच्या दर्शनाने सर्व देवदेवता आणि भक्तगण पुलकित होऊन आनंदित झाले होते. त्या आनंदाच्या उत्साहात त्यांनी श्री देवी मातेला अनेक अलंकारांनी सजवून शृंगारीत केले.*

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर कल्याणमध्ये मनसेचा जल्लोष



कल्याण : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या घोषणेला अवघे काही दिवस उरले असताना केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. मराठीसोबतच पाली, प्राकृत, आसामी आणि बंगाली या भाषांनाही अभिजात दर्जा मिळणार आहे. यानंतर राज्यभर जल्लोष करण्यात आला असून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. कल्याणमध्ये देखील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात जल्लोष करण्यात आला.यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूतळयाला पुष्पाहार अर्पण करून मनसैनीकांनी पेढे वाटून फटाके फोडत जल्लोष साजरा केला. यावेळी माजी आमदार, प्रदेश सरचिटणीस, कल्याण शहर अध्यक्ष प्रकाश भोईर, जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर, मुरबाड शहापूर विधानसभा जिल्हाध्यक्षा नयना भोईर, उपशहरअध्यक्ष गणेश चौधरी, सचिन पोपलाईटकर, महिला शहर अध्यक्षा कस्तुरी देसाई, लक्ष्मी बोरकर, चेतना रामचंद्र, राजन शितोळे, महेश बनकर, गणेश लांडगे, संदीप पंडित, रोहन पोवार आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा हि खूप वर्षांची मागणी होती. आज ती पूर्ण होतांना दिसत आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नरेंद्र मोदींकडे काही मागण्या केल्या होत्या, त्यामध्ये हि प्रमुख हि मागणी होती. त्यामुळे यामध्ये राज ठाकरे यांचे देखील यामध्ये मोठे योगदान असल्याची प्रतिक्रिया माजी आमदार प्रकाश भोईर यांनी दिली.

### महाराष्ट्र राज्य सरपंच संघटनेच्या

# कोकण विभाग अध्यक्षपदी रविश तांडेल



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) –**

कल्याण : महाराष्ट्र राज्य सरपंच संघटनेच्या कोकण विभाग अध्यक्षपदी ठाणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तसेच वासुंद्री गावाचे माजी सरपंच रविश तांडेल यांची नियुक्ती करण्यात आल्याचे नियुक्ती पत्र सरपंच सघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष प्रा राजेंद्र कराळे यांनी दिले आहे. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गजानन बोंडे, संघटक ॲड. देवा पाचभाई उपस्थित होते.

रविश तांडेल हे वासुंद्री ग्रामपंचायतचे सरपंच आसतांना विविध योजना राबविण्यात आल्या होत्या. तसेच सरपंच, उपसरपंच व सदस्य यांना दर महिन्याला मानधन देण्यात यावा यासाठी शासन दरबारी सन २०१८ पासून पाठपुरावा सुरू आहे. लोकसंख्या नुसार आता सरपंच, उपसरपंच व सदस्य यांना मानधन मिळणार असुनं शासनाने मंजुरी दिली आहे.

यावेळी सरपंच संघटनेचे कोकण प्रदेश अध्यक्ष रविश तांडेल यांनी सांगितले की, माझ्या सरपंच कारकिर्दीतील कामाची दखल घेऊन संघटनेच्या वतीने कोकण प्रदेश अध्यक्षपदी निवड केली आहे. गेल्या सातवर्षांपासून शासनाकडे सरपंच, उपसरपंच, सदस्य यांना मानधन मिळावा म्हणून सातत्याने पाठपुरावा सुरु होता. शासनाने मान्य केले आहे. तसेच आता सरपंच, उपसरपंच व सदस्य यांना बस मध्ये मोफत सवलत देण्यात यावी. टोल नाका फ्री पास देणे, मंत्रालयातील पास तसेच रेल्वेत प्रवास करताना पन्नास टक्के सवलत देण्यात यावी यासाठी आपण शासन दरबारी पाठपुरावा करणार असे सांगितले.

### केडीएमसीतर्फे जिल्हास्तरीय

# 'कबड्डी' स्पर्धेचे प्रथमच मॅटवर आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) –**

कल्याण : ठाणे जिल्हा परिषद, ठाणे व कल्याण डोंबिवली महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या ४९ आंतर शालेय विविध क्रीडा स्पर्धा सन २०२४-२५ चे आयोजन महानगरपालिके मार्फत महापालिका आयुक्त इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार प्रसाद बोरकर, उपआयुक्त (क्रीडा) यांच्या मार्गदर्शना खाली स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने कबड्डी स्पर्धेचे आयोजन सावळाराम टर्फ, भोईरवाडी, कल्याण (प) येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कबड्डी स्पर्धेचे आयोजन मातीच्या ग्राउंडवर न करता प्रथमच मॅटवर करण्यात आले.

या स्पर्धेचे उद्घाटन सहाय्यक आयुक्त तथा नोडल अधिकारी स्नेहा करपे यांच्या हस्ते करण्यात आले. स्पर्धेमध्ये १४ वर्षाखालील मुलांच्या संघात एकुण ८८ संघानी सहभाग दर्शविला. त्याचप्रमाणे १४ वर्षाखालील मुलींचा संघात एकुण ४८ संघानी सहभाग दर्शविला.



स्पर्धेमध्ये पहिला सामना १४ वर्षाखालील मुलांचा आदर्श इंग्लिश स्कुल विरुध्द के. एन.टी. स्कुल या दोन संघात झाला, या स्पर्धेत के.एन.टी. स्कुल हा संघ विजयी झाला तर १४ वर्षाखालील पहिला मुलींचा सामना रॉयल इंटरनॅशनल स्कुल विरुध्द बी. आर. मढवी स्कुल या संघात झाला, या सामन्यामध्ये रॉयल इंटरनॅशनल स्कुल विजयी झाली.

१४ वर्ष वयोगटाखालील एकूण १६३२ मुला मुलींनी सहभाग नोंदवला. स्पर्धा हया ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्याअधिकृत पंचांच्या माध्यमातून पार पाडण्यात आल्या. कबड्डी स्पर्धा साठी लागणाऱ्या मॅटची व्यवस्था माजी महापौर कल्याणी ताई पाटील फाउंडेशन यांनी उपलब्ध करून दिल्या. सदर प्रसंगी माजी महापौर कल्याणी ताई फाउंडेशनचे अध्यक्ष धनराज पाटील, क्रीडा पर्यवेक्षक प्रविण कांबळे, तज्ञ व तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष अंकुर आहेर, समिती सदस्य कृष्णा माळी, गजानन वाघ, गणेश मोरे, विजय सिंग, महादेव क्षीरसागर, रेणुका पिसे उपस्थित होते. कबड्डीचे खेळ प्रमुख म्हणून सुरज जाधव, दिनेश थळे, सुभाष पंजे यांनी काम पाहिले. कबड्डी स्पर्धेसाठी यज्ञेश्वर बागराव, अमोल पारखे, आकाश गायकवाड यांनी विशेष सहकार्य केले.




# शिवाजी घागस यांना मातृशोक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) –**

मुरबाड : तालुक्यातील शिरवली काकडपाडा येथील शिवाजी घागस हा मंगळवारी चार धाम गंगोत्री येथे देवदर्शनाला गेला आसता त्याच्या आईचे आकस्मिक निधन झाल्याची बातमी कळताच त्याने चार धाम दर्शन नाकारत आईचे अंत्यदर्शन घेण्यासाठी थेट विमानातुन प्रवास करुन आईचे अंत्यदर्शन घेतल्याची घटना समोर आली असल्याने या मातृप्रेमाची सर्वत्र चर्चा होत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की मुरबाड तालुक्यातील काकडपाडा शिरवली येथिल शेतकरी कुटुंबातील शिवाजी घागस हा वडिलोपार्जित शेतीत काबाड कष्ट करून आपल्या वृद्ध आईचे व परिवाराचे संगोपन करत असताना परिसरातील मित्र मंडळीने चारधाम गंगोत्री येथे देवदर्शनाला जाण्याचा निर्णय घेतला आपला मुलगा देवदर्शनाला जात आहे. या खुषीने परिवार असल्याने आई आपल्या मुलीकडे पाहुणी गेली .मात्र तेथे गेल्यावर सायंकाळी अचानक आईला हृदय विकाराचा झटका आला आणि आईचे निधन झाले.हि घटना शिवाजी याला समजताच त्याने चारधाम गंगोत्री चे



दर्शन नाकारत आपल्या माऊलीचे अंत्यदर्शन घेण्यासाठी थेट विमानाने प्रवास करुन घर गाठले. यमुनाबाई घागस ह्या तीच्या मुलीकडे पाहुण्या गेल्या आसता तेथे त्याना शुक्रवारी संध्याकाळी हॅडअँटकने त्यांचा मृत्यु झाला घरातील कुटुंबाने तो एकुलता एक मुलगा आहे तो आल्या शिवाय अग्नी दहन केले जाणार नाही त्यासाठी या महिलेचे प्रेत मुरबाड शवनगृहात ठेवण्यात आली मुलाच आगमन मुरबाड मध्दे होताच त्या महिलेला रुग्णालयातुन घरी आणले महिलेचे पुतणे संभाजी घागस नितिन घागस व मुलाची पत्नी शुभांगी यांनी आसा आग्रह केला की शिवाजी आल्याशिवाय अग्नी दिला जाणार नाही शनिवारी संध्याकाळी पाच वाजता येऊन त्याने आईच्या प्रेताला अग्नी दिला.

# दिलीप भोळे यांना पितृशोक



मुरबाड : कल्याण महावितरण परिमंडळ झोन मधील अधीक्षक अभियंता दिलीप भोळे यांचे वडील निवृत्ती मरीबा भोळे हे वयाच्या ८५ वर्षी अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले आहे.

त्यांच्या पश्चात तीन मुले ,दोन मुली व नातवंडे असा मोठा परिवार आहे त्यांच्या निधनाने भोळे परिवारावर मोठी शोक कला पसरली आहे.




०५ ऑक्टोबर २०२४

शनिवार

**मेष**

तुमच्या कठीण परिस्थितीत तुमचे कुटुंब तुमचे ढाल म्हणून काम करेल, यामुळे तुम्हाला धैर्य मिळेल. तुम्हाला शहरात नोकरीच्या नवीन संधी मिळतील.

**वृषभ**

दिवस तुमच्यासाठी समाधानकारक असेल.तुम्हाला शैक्षणिक क्षेत्रात यश मिळेल. तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून सहकार्य मिळेल.

**मिथुन**

फायदा होईल. मुलांच्या प्रगतीने आनंदी व्हाल. कौटुंबिक वातावरण चांगले राहील. चांगल्या सल्ल्याने पैसे कमवण्याचे नवीन साधन मिळेल.

**कर्क**

प्रेमीयुगुलांमध्ये पूर्वीपासून असलेले गैरसमज आज संपतील, नात्यात गोडवा राहील.आरोग्याशी संबंधित समस्या आज दूर होतील, तुम्ही उत्साही राहाल.

**सिंह**

तुम्ही सक्रिय राहाल आणि तुमचे आरोग्य आज तुम्हाला पूर्ण साथ देईल. आज तुम्ही कोणत्याही मदतीशिवाय पैसे कमवू शकाल.

**कन्या**

आज कोणताही घाईघाईत निर्णय घेणे टाळावे, थोडा विचार करणे चांगले राहील. मित्रांसोबत काही मुद्द्यावरून वाद होण्याची शक्यता आहे.

**तूळ**

मोठ्या व्यक्तीचा किंवा अनुभवी व्यक्तीचा सल्ला घेऊनच पुढे जाण्याचा प्रयत्न करा. मेहनत, संयम आणि समजूतदारपणाने काम पूर्ण कराल.

**वृश्चिक**

छोट्या-छोट्या गोष्टींवर राग आल्याने काही लोक तुमचा विरोध करू शकतात, तुम्ही तुमच्या रागावर नियंत्रण ठेवावे. बाहेर जाण्याची योजना आखतील.

**धनु**

तुमचा काही पैसा कौटुंबिक बाबींवर खर्च होऊ शकतो. कोणताही निर्णय शांतपणे घ्या. कलेच्या विद्यार्थ्यांसाठी दिवस अनुकूल राहील.

**मकर**

तुमच्यावर जबाबदाऱ्या असू शकतात. तुम्ही व्यस्त असाल. धीर धरा. आज तुम्ही मुले, कुटुंबातील सदस्य आणि मित्रांसोबत वेळ घालवू शकता.

**कुंभ**

घरातील वडीलधाऱ्यांकडून काही नवीन शिकायला मिळेल.जुन्या जबाबदाऱ्याही निकाली काढता येतील. इतरांच्या भावना समजून घेण्यात यशस्वी व्हाल.व्यवहारात

**मीन**

अभ्यासात जास्त वेळ जाईल.तुम्हाला तुमच्या घरातील मोठ्यांची सेवा करून बरे वाटेल. नातेवाईकांमध्ये तुमची प्रशंसा होईल.नात्यात गोडवा येईल.

## क्राईम न्यूज

### बदलापूर अत्याचार प्रकरणात
# आरोपी संचालकांना एका प्रकरणात जामीन तर दुसऱ्या प्रकरणात पोलीस कोठडी




दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -

कल्याण : बदलापूर मधील शाळेत शिकणाऱ्या दोघा चिमुरड्यावर झालेल्या अत्याचाराची माहिती दडपणारे फरारी शाळेचे संचालक तुषार आपटे व उदय कोतवाल या दोघा आरोपींना ठाणे गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलिसांनी अटक करून कल्याण न्यायलाया समोर हजार केले असता न्यायालयाने दोघा आरोपींना एका गुन्ह्यात जामीन दिला तर दुसऱ्या गुन्ह्यात पोलीस कोठडी सुनावली.

बदलापूर मधील दोघा चिमुरडीवर नराधम अक्षय शिंदे याने अत्याचार केला होता. या घटनेची माहिती असूनही तुषार आपटे व उदय कोतवाल या दोघा शाळेच्या संचाल कांनी दडवून ठेवल्याची माहिती उजेडात येताच दोघा संचाल कानी पळ काढीत गेल्या दीड महिन्या पासून फरार झाले होते. दरम्यान या दोघा फरार संचाल कांनी न्यायालयात अटक पूर्व जामिनासाठी अर्ज केला होता न्यायलयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला होता. या दोघा फरार आरोपीचा पोलीस कसून तपास करीत होते अखेरीस ठाणे गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलि सांनी बुधवारी रात्री दोघा फरार संचालक आरोपींना अटक करीत गुरुवारी दुपारी कल्याण न्यायालया समोर हजार केले.

सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार न्यायाल यात, गुन्हे शाखेने सरकारी वकील अश्विनी भामरे पाटील यांच्यामार्फत दोन्ही आरोपींच्या पोलिस कोठडीची मागणी केली.

पाटील यांनी युक्तिवाद केला की, अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना कळल्यानंतरही शाळेचे अध्यक्ष व सचिवांनी पोलिसांना माहिती दिली नाही. घटनेच्या दिवशी शाळेतील सीसीटीव्ही बंद होते आणि याचा तपास करण्यासाठी त्यांनी आरोपींची चौकशी करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र, या प्रकरणात दाखल झालेला जामीनपात्र पॉक्सो कायद्याचा गुन्हा आणि तत्सम इतर अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयाने दिलेल्या जामीनाचा दाखला देत न्यायाधीशांनी आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावली.

आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर त्यांच्या वकिलाने जामीन अर्ज दाखल केला, तो न्यायाधीशांनी मंजूर केला. यानंतर गुन्हे शाखेने याच गुन्ह्यात दुसऱ्या पीडितेच्या एफआयआरमध्ये कोठडीची मागणी केली. न्यायाधीशांनी ही विनंती मान्य केली आणि नंतर शाखेने कोतवाल आणि आपटे या दोघांनाही त्या दुसऱ्या प्रकरणात अटक केली.

या प्रकरणी पोलिसांनी दोन मुलींवर लैंगिक अत्याचाराचे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल केले होते. त्यानंतर पोलिसांनी शाळेचे अध्यक्ष आणि सचिव यांनाही पोक्सो कायद्यांतर्गत आरोपी केले.

आरोपींचे वकील संजयकुमार धनके यांनी प्रसिद्धी माध्यामा समोरे जाताना एका प्रकरणात जमीन मंजूर झाला असून दुसऱ्या प्रकरणात पोलि सांनी ताबा घेतला असून उद्या कोर्टात त्या संदर्भात हजर केले जाणार असल्याचे सांगितले.

# ट्रेनमध्ये प्रवासादरम्यान मैत्री नंतर लॉज मध्ये बलात्कार
## आरोपीला परभणी येथून अटक



दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -

कल्याण : कल्याणमधील लॉजवर नेऊन २१ वर्षीय तरुणीवर बलात्कार केल्या प्रकरणी आरोपी अभिजीत जोगदंड (२५) याला महात्मा फुले पोलिसांनी परभणी येथून अटक केली आहे.

त्याला आज कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली आहे.

आरोपी अभिजीत हा मूळचा परभणी येथे राहणारा आहे. तरुणी नांदेड जिल्ह्यातील एका गावात राहणारी आहे. रेल्वे गाडीत प्रवासा दरम्यान तरुणीसोबत अभिजीतची ओळख झाली. त्याने तिला कल्याण रेल्वे स्थानकात उतरविले. त्यानंतर तो तिला लॉजवर घेऊन गेला. त्याठिकाणी तरुणीने त्याला विरोध केला. मात्र त्याने तू टेन्शन घेऊ नकोस मी तुझ्याशी लग्न करणार आहे असे सांगून तिच्यासोबत जबरदस्तीने शारीरीक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर त्याने त्याचे मामा मामी बदलापूरला राहतात. त्याठिकाणी जाऊ अशी बतावणी केली. तिला बदलापूर येथे कुठे तरी सोडून तो पसार झाला. पिडीत तरुणीने अभिजीतला संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. त्याचा काही प्रतिसाद नसल्याने तिने महात्मा फुले पोलिस ठाणे गाठले. ऑगस्ट महिन्यात आरोपी अभिजीत याच्या विरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरिक्षक प्रतिभा माळी करीत होते. या प्रकरणात आरोपीला परभणी येथून पोलीस अधिकारी किरण वाघ यांनी अटक केली आहे. त्याला आज न्यायालयात हजर केले. आरोपीची ओळख परेड करण्यासाठी पोलिस कोठडीची मागणी न्यायालयाकडे करण्यात आली होती. न्यायाल याने आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

# अभिजात माय मराठी





- शिवांजय रमेश सायली बुटेरे
(butereshivanjay@gmail.com)

खरं तर लहानपणापासूनच मराठीविषयी गोडी निर्माण झाली होती. दैनंदिन चालण्यात, वागण्यात, बोलण्यात सतत तिचा वापर होतं असल्यामुळे आपोआपच आपलीशी होऊन गेली. पण हे सर्व जरी असलं तरी 'अभिजात भाषा' म्हणजे नेमकी संज्ञा काय ? माहित नव्हतं. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरु केल्यावर राज्यशास्त्रात अभिजात भाषा, अन्य भाषांना दिलेला दर्जा, मराठीसाठी रंगनाथ पठारे समिती या सगळयांतून नक्की अभिजात भाषेचा दर्जा काय ? यातून काय साध्य होईल ? हे कळालं आणि मग कुठेतरी वाटू लागलं की लवकरात लवकर आपल्या भाषेला हा दर्जा मिळाला तर अजून फायदा होईल आणि आज अभिमान वाटतो की आपली 'माय मराठी ही अभिजात भाषा आहे.'

माझ्या मराठीची बोल कौतुके,
परी अमृताते पैजा जिंके | ऐसी अक्षरे रसिके, मिळविण ||

मराठीचे वर्णन करताना संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या या मराठीच्या ओळी, तर याच मराठीचे गोडवे गाताना कवी सुरेश भट लिहितात की,

**लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी**
**जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी**
**धर्म, पंत, जात एक जाणतो मराठी**
**एवढ्या जगात माय मानतो मराठी**

आणि खरंच आपण आपलं भाग्य मानल पाहिजे की या महाराष्ट्रात आपण मराठी भाषिक म्हणून जन्माला आलो. अमृतापेक्षाही गोड अशी मराठी वाणी. 'अ ते ज्ञ पर्यंतची बाराखडी म्हणजे अज्ञानापासून सुरू झालेला ते ज्ञानावर येऊन संपलेला प्रवास म्हणजे मराठी.' मराठी भाषिक म्हणून दृष्टी टाकताना इंग्रजीचे आक्रमण आणि जागतिकीकरणाचा झंझावतात मराठी भाषा नष्ट होते की काय अशी भीती सर्वत्र व्यक्त केली जाते परंतु जागतिक दृष्टिकोनातून मराठी भाषिकांची संख्या पाहता ही भीती अनाठायी आहे यात काही मात्र शंका नाही. आज मराठीसाठी अनेक मार्ग खुले झाले आहेत. संगणक, विज्ञान, तंत्रज्ञान देखील मराठीतून उपलब्ध झाले आहे परंतु आज संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होऊन जवळजवळ अर्धशतक उलटून गेलं तरी देखील ज्या स्तरावर मराठीचा प्रचार आणि प्रसार व्हायला हवा होता, ज्या गतीने त्याला उंची प्राप्त व्हायला हवी होती ती झाली नाही, कारण आपणच केलेल्या इंग्रजीच्या अतिलाडामुळे नमराठी भाषिकांना आणि विशेषतः मराठी तरुणांना मराठी बोलणे, लिहिणे, वाचणे लज्जास्पद वाटू लागले. कमीपणाचे लक्षण वाटू लागले; आणि म्हणून गरज आहे याच मराठी भाषेची नाळ तरुणांमध्ये पोहोचविण्याची त्यादृष्टीने प्रयत्न करण्याची

मुळात या विषयावर प्रकाश टाकताना आपण जर बघितलं तर विद्यार्थी जेव्हा प्राथमिक शिक्षण घेण्यास सुरुवात करतो तेव्हा त्याची बुद्धी खऱ्या अर्थाने वृद्धिंगत होण्यास सुरुवात होते. त्यामुळे लहानपणीच त्याच्या मनात मराठी विषयी गोडी, प्रेम निर्माण केलं मग ते विविध खेळांमार्फत, कौशल्यांद्वारे असो किंवा कार्यशाळांमार्फत असो जर शालेय वयात असतानाच मराठी त्याच्या मनात उत्तम रित्या उतरवली तर मराठी भाषा आमची हा जो देखावा दाखवला जातो तो दाखवला जाणार नाही आणि येणारी पिढी ही खरच मराठी विषयी अभिमान बाळगणारी असेल आदर व्यक्त करणारी असेल. आज जगात श्रेष्ठ साहित्यसंपदेच्या यादीत जर कोणाचं नाव प्रामुख्याने घेतलं जातं तर ते म्हणजे मराठी साहित्याचं. संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरी पासून ते संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथांच्या ओव्यांपर्यंत, विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या निबंधमालेपासून ते सावरकरांच्या कमला, गोमांतक सारख्या महाकाव्यांपर्यंत, मनालाही अश्रूंचे बांध फुटतील अशा कवी कुसुमाग्रजांच्या कवितांपासून ते प्र.के. अत्रे, पु ल देशपांडे यांच्या विनोदी लेखांपर्यंत अशा सर्व रसांनी युक्त असलेले साहित्य म्हणजे मराठी साहित्य; पण आमच्या तरुणांच इतकं दुर्दैव की आम्ही शेरलॉक होम्स वाचतो पण ज्ञानेश्वरी वाचत नाही. आम्ही विल्यम शेक्सपियर वाचतो पण मराठी कथा- कादंबऱ्या वाचत नाही. आम्ही पॉप संगीत ऐकतो पण भजन, कीर्तन, शास्त्रीय संगीत ऐकत नाही. म्हणून सर्वप्रथम मराठीचा प्रचार आणि प्रसार जर तरुणांमध्ये करायचा असेल तर त्यांच्या हाती मराठी साहित्य दिलं पाहिजे आणि नुसतं देऊन चालणार नाही तर ते त्यांना वाचायला भाग पाडल पाहिजे. आपल्याकडे पुस्तके, विश्वकोश, ज्ञानसंच तयार होत राहिले पण ते फक्त सरकारी खात्यांमध्ये, ग्रंथालयांमध्ये आणि काही साहित्यिकांच्या घरातच. जास्तीत जास्त ठिकाणी जास्तीत जास्त लोकांनी ती भाषा बोलणे हा कोणत्याही भाषेच्या संवर्धनाचा पहिला टप्पा असतो. त्यामुळे जर मराठी भाषा तरुणांमध्ये वृद्धिंगत करायची असेल तर सर्वप्रथम ती भाषा सर्वत्र आणि सर्वांनी हिरारीने बोलली पाहिजे. आणि हे सर्व करत असताना भाषेच्या बोली वाढविणे आणि जोपासणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. मराठीमध्येही अनेक बोली आहेत कोकणी, अहिराणी, वऱ्हाडी हे ठळक भेद झाले परंतु याच्या देखील अनेक पटबोली आहेत हे तरुणांना देखील ज्ञात करून दिले पाहिजे. उदाहरणार्थ कोकणात वारली, कातकरी, आगरी, मालवणी असे अनेक अनेक भेद आहेत पण आज किती तरुणांना हे माहित आहे ? हे तरुणांना ज्ञात करून दिले पाहिजे.

सावरकरांचा भाषेवर विशेष पगडा होता. त्यांचं नेहमी म्हणणं असायचं की मराठी लिहिताना वाचताना त्रास होईल मात्र नंतर त्याची सवय होऊन जाईल; आणि आज तर २१ व शतक आहे. जग विज्ञान आणि तंत्रज्ञानाकडे वळलेलं आहे आणि याच तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मराठी तरुणांमध्ये मराठी बोलण्याइतपत तरी रुजली गेली पाहिजे. आजची तरुणाई सोशल मीडियाशी जास्त संलग्न झालेली आहे मग ते फेसबुक असो इंस्टाग्राम असो किंवा व्हॉट्सॲप असो, याचाच उपयोग करून त्यावर मराठी विषय विविध पेज बनवून देखील मराठी सर्वांपर्यंत आपण पोहोचू शकतो. सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रमात जास्तीत जास्त मराठी बोलली पाहिजे.

इंग्रजीला महत्त्व देणाऱ्या याच इंग्रज लोकांचं मराठीतलं संशोधन आणि त्यातील विद्वत्ता तरुणांना दाखवून दिली पाहिजे. युरोपात इंग्रजी ही मातृभाषा आणि आपल्याकडे व्यवहार भाषा म्हणून वापरतात हा भेद तरुणांना दाखवून दिला पाहिजे. आणि या सर्वांची जर दुसरी बाजू बघितली तर जसं आई-वडील आपल्या पाल्यावर संस्कार करतात पण त्या संस्काराचे पालन किती करायचं हे जसं त्या पाल्याच्या हाती असतं तसंच मराठी पोहोचविण्यासाठी किती देखील प्रयत्न केले गेले तरी ते दैनंदिन जीवनात किती उपयोगी आणायचे हे तरुणांच्या हाती आहे. आजची कित्येक मराठी लोकं ज्यांनी आपल्या मातृभाषेचा झेंडा अटकेपार केला आहे मग ते वीस पदव्या प्राप्त डॉक्टर श्रीकांतजी जिचकर असतील किंवा भारतीय मसाल्यांचे दाते धनंजय दातार असतील, भारतरत्न सचिन तेंडुलकर असतील किंवा आशा भोसले असतील. आज मराठी भाषा तरुणांपर्यंत पोहोचविण्यासाठी तिच्या समृद्धीसाठी त्यांना आपला दृष्टिकोन बदल ायला हवा. भाषेविषयी प्रेम हे नकारात्मक किंवा प्रतिक्रियात्मक असता कामा नये. केंद्र आणि राज्य सरकार त्यांच्या दृष्टीने प्रयत्न करतीलच पण पण आपणही भाषेविषयी कोणतीही लज्जा न बाळगता उद्याच्या जबाबदारीसाठी ती समृद्ध कशी होईल याचा स्वच्छ विचार व्हायला हवा.

### माजी नगराध्यक्ष मोहन सासे यांच्या
# स्वराज्य प्रतिष्ठान नवरात्रौत्सवाला आजपासून प्रारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -

मुरबाड : मुरबाड नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष मोहनशेठ सासे यांच्या स्वराज्य प्रतिष्ठानकडुन मुरबाड शहरातील खुले नाट्यगृह येथे भव्य स्वरूपात नवरात्रौत्सवाचे आयोजन केले जाते. उत्सवाचे यंदाचे ६ वे वर्ष असून आज पासून देवीचा जागर निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन या निमित्ताने केले आहे. यामधे नऊ दिवस सायंकाळी ५.३० ते ९ पर्यंत आरती, हरिपाठ, भजनाचे कार्यक्रम होतील व



तद्नंतर रात्री ९ ते ११ दांडिया खेळ खेळला जाणार आहे. गरबा रसिकांसाठी विशेषतः महिलांसाठी होम मिनिस्टर सह विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले गेले असल्याची माहिती नगरसेविका मधुरा सासे यांनी दिली . गेले पाच वर्ष स्वराज्य प्रतिष्ठानच्या नवरात्रौ उत्सवाला गरबा रसिकांनी प्रचंड गर्दी केली होती. गरबा प्रेमीसाठी स्वराज्य प्रतिष्ठानचा उत्सव ही एक मोठी पर्वणी असून यावर्षी ही मुरबाड शहरातील दांडिया रसिक गर्दीचा उच्चांक करतील असे प्रतिष्ठान कडून सांगण्यात येत आहे. सर्व दांडिया रसिकांनी व प्रेक्षकांनी शांततेत व शिस्तीत आनंद लूटावा असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहनशेठ सासे यांनी केले आहे.

# व्लॉगर: खून: रहस्य: ?
## 'लाईक आणि सबस्क्राईब'चा उत्कंठावर्धक ट्रेलर प्रदर्शित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता / (प्रतिनिधी) -

काही दिवसांपूर्वी 'लाईक आणि सबस्क्राईब' या चित्रपटाचा अंगावर शहारा आणणारा टिझर प्रदर्शित झाला होता. या टिझरमुळे प्रेक्षकांच्या मनात अनेक प्रश्नांनी घर केले होते. हाच सस्पेन्स अधिक वाढवण्यासाठी आता 'लाईक आणि सबस्क्राईब'चा ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. हा रोमांचक ट्रेलर बघून प्रत्येकाच्या मनात आता असंख्य प्रश्नांची मालिकाच सुरू झाली आहे.

नितीन वैद्य प्रॉडक्शन्स प्रस्तुत, एस. एन. प्रॉडक्शन्स एलएल पी आणि अभिषेक मेरूकर प्रॉडक्शन्स यांच्या सहकार्याने प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटाचे




नितीन प्रकाश वैद्य, अभिषेक मेरूकर निर्माते असून 'लाईक आणि सबस्क्राईब'चे लेखन आणि दिग्दर्शन अभिषेक मेरूकर यांनी केले आहे. यात अमेय वाघ, अमृता खानविलकर, जुई भागवत, शुभंकर तावडे, विठ्ठल काळे या कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत. 'लाईक आणि सबस्क्राईब या चित्रपटाचा ट्रेलर पाहून प्रेक्षकवर्ग थक्क झाला आहे. जुई भागवत एका व्लॉगरच्या भूमिकेत दिसत असून, ती एका संकटात अडकल्याचे दिसतेय. टिझरमध्ये कोणाचा तरी खून झाल्याचेही दिसत आहे. तर अमृता खानविलकर पोलिसांच्या मदतीने कोणत्यातरी रहस्याचा उलगडा करण्याचा प्रयत्न करत असतानाच अमेय वाघकडेही काहीतरी गुपित असल्याचे दिसत आहे. हा सगळाच प्रकार संशयित असून याचा उलगडा १८ ऑक्टोबर रोजी होणार आहे. ट्रेलर पाहून या चित्रपटाची कथा कमाल असणार, हे नक्की!

चित्रपटाचे दिग्दर्शक अभिषेक मेरूकर म्हणतात, 'लाईक आणि सबस्क्राईब' हा चित्रपट फक्त एक रहस्यमय कथा नसून आजच्या तरूणाईची कथा सांगणारा चित्रपट आहे. या चित्रपटात प्रत्येक पात्राचे ध्येय वेगळे असले तरी त्यांचे आयुष्य एकाच ठिकाणी येऊन थांबते. हे सर्वात मोठे रहस्य चित्रपटाची औत्सुक्य वाढवते . प्रत्येळ वेळी चित्रपटाची कथा एक वेगळे वळण घेणारी असून प्रेक्षकांना खूर्चीला खिळवून ठेवणारी आहे.'

# ऋतुजा देगलूरकरला कराटे स्पर्धेत सुवर्णपदक







कल्याण : नुकत्याच नवी मुंबई येथे झालेल्या उलवे येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट कॉम्प्लेक्स येथे अखिल भारतीय खुली कराटे अजिंक्य स्पर्धेत सब ज्युनिअर या गटातून ऋतुजा देगलूरकर हिने सुवर्णपदक पटकावले असून ही ११ वर्षा खालील गटात खेळली आहे. त्यानंतर अनुप यादव याने ११ वर्षाखालील गटात कांस्यपदक तर लकी नायडू याने रौप्य पदक १० वर्षाखालील गटात पटकावले आहे.

सर्व विद्यार्थी कल्याण येथील नारायणा टेक्नो स्कूलमध्ये शिकत असून यांचे प्रशिक्षक विवेक शुक्ला यांनी अतिशय मेहनतीने विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन प्रशिक्षक आणि विद्यार्थ्यांचे आई-वडील यांच्या मेहनतीनंतर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेण्यासाठी प्रेरित करून प्रोत्साहन दिले त्यानंतरच हे तीनही विद्यार्थी इथपर्यंत पोहोचले आहेत.

या स्पर्धेदरम्यान तीनही विद्यार्थ्यांचे पालक आणि प्रशिक्षक उपस्थित होते. या वयात पालकांनी जर आपल्या पाल्यास खेळण्यासाठी प्रवृत्त करून योग्य ते मार्गदर्शन करून योग्य त्या प्रशिक्षकाची नेमणूक करून प्रशिक्षण दिले तर भविष्यात राज्यासह देशाचं नाव अवलंबिक करण्यासाठी खऱ्या अर्थाने मदत होईल. ऋतुजाने कराटे खेळण्यासाठी हट्ट धरला असून मी तिचा कराटे स्पर्धेचा हट्ट पुरवित आहे. माझ्यासारखे इतरही पालकांनी आपल्या पाल्याचे हट्ट पुरवावे मोबाईलवर वारंवार गेम खेळवण्यांपेक्षा मैदानावर खेळले जाणारे खेळ कधीही शरीरासाठी आणि आरोग्यासाठी चांगलेच आहेत अशी प्रतिक्रिया ऋतुजाचे वडील वसंत देगलूरकर यांनी दिली. तर मी माझ्या विद्यार्थ्यांना यापेक्षाही मोठमोठ्या स्पर्धेत खेळवण्यासाठी तयार करीत आहेत फक्त पालकांनी मला सहकार्य प्रशिक्षक विवेक शुक्ला यांनी सांगितले.

# रायगड किल्ल्याची युनेस्को पथकाकडून पाहणी

पेण : प्रतिष्ठित जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेशासाठी नामांकनाच्या मुल्यांकन प्रक्रियेचा एक भाग म्हणून युनेस्कोच्या शिष्टमंडळाने आज रायगड जिल्ह्यातील रायगड किल्ल्याला भेट दिली आणि पाहणी केली. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय), महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग, वन विभाग आणि स्थानिक प्रशासन यांच्या अधिकाऱ्यांसह युनेस्कोच्या पथकाने किल्ल्याची सखोल पाहणी केली. या पथकाने कुशावर्त तलाव, होळीचा माळ, जगदीश्वर मंदिर, बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराज समाधी, हत्तीखाना, भवानी मंदिर आणि टोक, टकमक टोक, यांमहत्त्वपूर्ण ठिकाणासह विविध ऐतिहासिक खुणांना भेट दिली. या पथकाने किल्ल्याचा इतिहास आणि सद्यस्थितीबद्दल उपस्थित अधिकाऱ्यांकडून तपशीलवार माहिती घेतली. या पथकामध्ये आंतरराष्ट्रीय तज्ञ हेवान्ग ली, सह संचालक जागतिक वारसा (ए एस आय) मदन सिंग चौहान, महाराष्ट्र शासन पुरातत्व विभाग संचालक सुजित उगले, उपसंचालक हेमंत दळवी, डॉ शुभा मजुमदार यांचा समावेश होता. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या सोबत झालेल्या चर्चे दरम्यान त्यांनी किल्ल्यातील



हवामान, वनस्पती आणि इतर संबंधित पर्यावरणीय घटकांवर चर्चा केली. तसेच या किल्ल्याच्या संवर्धनासाठी रायगड जिल्हाप्रशासनाने घेतलेले निर्णय सुरु असलेली कार्यवाही तसेच पर्यटन विकासासाठी केलेल्या उपाययोजना याबाबत माहिती घेतली.

युनेस्कोने नामांकनाच्या संदर्भात हाती घेतलेल्या उपक्रमांबद्दल श्री जावळे यांनी समाधान व्यक्त केले. तसेच गडाच्या जतनामध्ये एकूणच प्रशासन, स्थानिक नागरिकांचा असलेला , सहभाग याविषयी माहिती दिली. युनेस्को टीमने देखील देखभाल आणि संवर्धनासाठी संभाव्य सुधारणांबद्दल त्यांची मते मांडली. भेटीदरम्यान, शिष्टमंडळाने स्थानिक प्रतिनिधी आणि गावकऱ्यांशी देखील संवाद साधला. यावेळी प्रांत डॉ ज्ञानोबा बाणापुरे ,प्राधिकरणच्या श्रीमती सलोनी साळुंखे,युनेस्को सदस्य,जिल्हाधिकारी, प्रांत बाणापुरे,प्राधिकरणाच्या सदस्य सलोनी साळुंखे,शिखा जैन, पुरातत्व विभाग श्री शेख,रायगड पुरातत्व विभाग श्री दिवेकर, वरूण भामरे तहसीलदार महेश शितोळे, रोप वे प्रतिनिधी राजेंद्र जोग,माजी सरपंच पाचाड राजेंद्र खातू,उपसरपंच संदीप ढवळे,गाव कमिटी सदस्य हिरकणीवाडी मनोहर अवकीवकर आदीनी चर्चेत सहभाग घेतला.

यावेळी रायगड किल्ला पाहण्यासाठी आलेल्या नवोदय विद्यालय निजामपूर च्या विद्यार्थ्यांशी देखील या पथकाने संवाद साधला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वारसाशी जोडलेल्या १२ निवडक किल्ल्यांपैकी स्वराज्याची राजधानी असलेला हा रायगड किल्ला जागतिक स्तरावर ओळखण्यासाठी विचाराधीन आहे.

या समावेशामुळे रायगड किल्ल्याला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळेल आणि जागतिक पर्यटक आकर्षित होतील, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल तसेच प्पर्यटनाला चालना मिळेल असा विश्वास जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी यावेळी व्यक्त केला.

### लाखो भाविकांचे श्रद्धास्थान

# खरोशीची श्री केळंबादेवी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

पेण तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गावरील जिते नाक्यावरून पूर्वेस साधारणतः दोन किलो मीटर अंतरावर पक्क्या डांबरी रस्त्याने जोडलं गेलेलं खरोशी गाव तसं बाळगंगा नदीच्या काठी बसलेले. मुळातच निसर्गरम्य सानिध्य लाभलेल्या डोंगरद-यांच्या कुशीत बसलेल्या या खरोशी गावाच्या उत्तरेस डोंगर माथ्यावर आहे. सर्वांच्या श्रद्धेचे श्री केळंबा देवीच मंदिर. अ



पेण परिसरातील व मुंबईपासून ७० कि.मी.अंतरावर असलेल्या सर्वपरिचीत अशा भक्तांचे श्रद्धास्थान असणारी स्वयंभू साश्वत आणि सदैव जागृत असणा-या व नवसाला पावणा-या वेळोवेळी संकटाच निवारण करणाऱ्या खरोशी येथील श्री केळंबादेवीची माहिती आपल्या हाती देताना मता अतिशय आनंद होत आहे.

फार फार वर्षापूर्वी इथल्या डोंगर माथ्यावर ऋषीच वास्तव्य होत. बाळगंगा नदीच्या काठावरून या पवित्र ठिकाणी जाताना रस्त्याच्या बाजूला दुतर्फा पारिजातक, फणस, आंबा, चाफा यांची असंख्य झाडे आहेत. त्यामधून जाणा-या वाटेवर नजर पडली की वाटतचं श्री केळबादेवीआपणास दर्शनासाठी बोलवित आहे. देवीच्या रस्त्याला लागलो की, निसर्गाचा अविष्कार असलेला हिरवागार, सुखद असा रम्य परिसर पाहिला की, मनाला जी एक शांती लाभते त्याची तुलनाच करता येणार नाही मंदिराच्या परिसरात कुठेही पहायला मिळणार नाही इतक मोठ बेल वृक्षांच रानच्या रान आहे. तसेच केळी, चाफा. रामवृक्ष, कणेरी या सारख्या इतरही फुलझाडांनी परिसर फुलून गेलेला आपणास दिसून येईल, अशा ठिकाणी वास्तव करुन आहे. तुमची आमची सगळयांची आई. हाकेला धावणारी, नवसाला पावणारी, श्रद्धास्थान असणारी आई श्री केळंबादेवी.

फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे की, एके दिवशी गावातील एक गृहस्थ केळीची पाने आणण्यासाठी डोंगर माथ्यावर गेला असता त्याने एक केळ तोडली त्या केळीमधून लाल रक्त वाहू लागले. हा प्रकार पाहताच तो गृहस्थ घाबरला व सरळ गावात येऊन सदरचा प्रकार त्यांनी गावक-याच्या कानावर घातला. हे ऐकताच सर्व गावकरी त्या घडलेल्या चमत्कारिक दृश्याची पाहणी करण्याकरिता गेले असता त्यांनाही त्या केळीमधून लाल रक्त येत असल्याचे दिसून आले.या पाहिलेल्या दृश्यांची माहिती निष्णांत ज्योतिषाला सांगितली व त्याने सांगितले की, इथे निश्चितपणे भगवंताचे स्थान आहे. परमेश्वराचे स्थान आहे. या जागेवर देवीचे वास्तव्य आहे. त्यामुळे त्या ठिकाणी स्थापना करण्यात आली. केळीच्या झाडातून प्रकट झालेल्या साक्षात व स्वयंभू देवीला श्री केळंबादेवी हे नाव देण्यात आले. आजतागायत श्री केळंबादेवी जागृत असल्याची अनेक भक्तगणाना प्रचिती आली आहे. कोणत्याही कार्याची सुरुवात करा वा संकटकाळी फक्त देवीच नामस्मरण करा म्हणजे आपल्या संकटाच निवारण करण्यासाठी धावून येणारच या बाबतीत हजारो लोकांचे अनुभव आपणास ऐकावयास मिळतील म्हणून तर नवरात्र उत्सवा व्यतिरिक्त दर मंगळवारी बाहेरील गावातील तसेच पेण, पनवेल, उरण, अलिबाग, ठाणे, मुंबई येथील लोक मोठ्या प्रमाणावर श्री केळंबा देवीच्या दर्शनाला येत असतात.




श्री केळंबा देवीचा नवरात्र उत्सव दरवर्षी फार मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. घटस्थापनेच्या दिवशी गावातून देवीची पालखी वाजत गाजत माऊलीच्या देवळात नेली जाते. नवरात्रीचे नऊ दिवस गावातील तसेच गावाच्या बाहेरील भक्तगण श्री केळंबा देवीच्या भक्तीपोटी, प्रेमापोटी व नवसापोटी देवळात दिवसरात्र वास्तव्य करून राहतात. नवरात्रीच्या उत्सवात नवस फेडण्यासाठी दूरशेत, जिते, बळवली, खारपाडा, गोविर्ले, आंबिवली दादर रावे कळवे हमरापुर या पंचक्रोशीतील लोकांची खूपच रिघ लागलेली असते. देवीचा वास्तवाचा, संकटकालीन दर्शनाचा अनुभव कित्येक लोकांना आल्यामुळे प्रत्येक वर्षी या भक्तगणात खूपच वाढ झालेली दिसून येते. घटस्थापने पासूनख्या नवव्या दिवशी श्री केळंबादेवीची पालखी देवळातून निघून टाळ मृदुंगाच्या तालात भजन म्हणत गुलाल-बुक्का उधळत वाजत गाजत मिरवणुकीने पुन्हा गावात आणली जाते. अशा या जागृत, स्वयंभू नवसाला पावणाऱ्या श्री केळंबा देवीचे मंदिर श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळापासून म्हणजे शके १६०७ मध्ये बांधले होते. आजपर्यंत ४१७ वर्षे या मंदिरास झाली. सर्व गावक-यांनी एक निश्चयाने एक दिलाने एक मनाने मंदिराचा जिर्णोद्धार करून गावकरी मंडळीनी आपल्या समस्या अडचणी, संकटे बाजूला सारून व भक्तगणांकडे मदतीचा हात मागून आज हे भव्य आणि दिव्य मंदिर उभे केले आहे.

माऊली केळंबा मातेचा नवरात्र उत्सव ३ ऑक्टोबर ते ११ ऑक्टोबर असा नऊ दिवस चालणार आहे या नवरात्री नऊ दिवस पाटील व माळी भाऊबंद यांची पाळी असल्यामुळे ते नऊ दिवस माऊलींची सेवा करणार असून गावातील घरत पाटील ठाकूर म्हात्रे माळी भोंडकर व गावंड भाऊबंद आलेल्या सर्व भक्तांना मनोभावे दर्शन देऊन त्यांचे स्वागत करण्यात येते.

तसेच लाखो भक्तगण मोठ्या श्रद्धेने नवस बोलण्यासाठी नवस फेडण्यासाठी येत असतात. नवरात्रीचा उत्सवात नऊ दिवस लाखो भाविक दर्शन घेतात. आलेला प्रत्येक भक्तगण डीजेच्या तालावर मनसोक्तपणे नृत्य करून आनंद द्विगुणित करत असतात. आणि नंतर त्यांची पावले घराकडे वळतात अशा माऊलीच्या दर्शनासाठी आलेल्या सर्व भाविकांचे मनापासून स्वागत.

---

जाहीर नोटीस

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कल्याण यांचे कार्यालय; कल्याण**

जा.क्र. फौजदारी/ जन्म मृत्यु नोंद /टि-६/ एसआर-५७५/२०२४ दि. ०६/०९/२०२४

**प्रति.**

**१) रामदास अनंता भोईर राहणार,**
**मु.पळसोळी. पो. वेहळे .............................. अर्जदार**

**विरुध्द**

**२) ग्रामपंचायत पळसोळी,**
**पो. वेहळे ता. कल्याण जि.ठाणे ....................सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे :-

३८. उपरोक्त अर्जदार यांची मुलगी **अश्विनी रामदास भोईर** यांचा जन्म दिनांक **२७-०५-१९९५** रोजी त्यांचे ता. कल्याण, जि. ठाणे. येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्माची नोंद **ग्रामपंचायत पळसोळी पो. वेहळे ता. कल्याण जि. ठाणे** दफ्तरी करुन जन्म दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तीक कारणांसाठी त्यांच्या मुलीच्या जन्म दाखल्याची आवश्यकता आहे.

६९. उशीरा स्वताची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास अर्ज क्रमांक ०६-०८-२०२४ दाखल केला आहे.

७०. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी; वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांच्या मुलीचा जन्म नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे २३/०९/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

**तहसील कार्यालयाचा शिक्का**

**हुकुमावरुन**
**सही /-**
**कार्यकारी दंडाधिकारी, कल्याण**

---

जाहीर नोटीस

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कल्याण यांचे कार्यालय; कल्याण**

जा.क्र. फौजदारी/ जन्म मृत्यु नोंद /टि-६/ एसआर-५७६/२०२४ दि. ०६/०९/२०२४

**प्रति.**

**१) रामदास अनंता भोईर राहणार,**
**मु.पळसोळी. पो. वेहळे .............................. अर्जदार**

**विरुध्द**

**२) ग्रामपंचायत पळसोळी,**
**पो. वेहळे ता. कल्याण जि.ठाणे ....................सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे :-

३९. उपरोक्त अर्जदार यांची मुलगी **अक्षय रामदास भोईर** यांचा जन्म दिनांक **२७-०९-१९९८** रोजी त्यांचे ता. कल्याण, जि. ठाणे. येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्माची नोंद **ग्रामपंचायत पळसोळी पो. वेहळे ता. कल्याण जि. ठाणे** दफ्तरी करुन जन्म दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तीक कारणांसाठी त्यांच्या मुलाच्या जन्म दाखल्याची आवश्यकता आहे.

७१. उशीरा स्वताची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास अर्ज क्रमांक ०६-०८-२०२४ दाखल केला आहे.

७२. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी; वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांच्या मुलाचा जन्म नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे २३/०९/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली. हुकुमावरुन

**तहसील कार्यालयाचा शिक्का**

**सही /-**
**तहसिलदार; कल्याण**
**कार्यकारी दंडाधिकारी, कल्याण**

---

## गणित अध्यापक मंडळातर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

**पेण :** महाराष्ट्र राज्य संलग्न रायगड गणित अध्यापक मंडळातर्फे गणित संबोध प्राविण्य प्रज्ञा व पारंगत परीक्षा यांचा गुणगौरव सोहळा प्रायव्हेट हायस्कूल पेण येथे संपन्न झाला कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे चांगा काना ठाकूर(ण्ख्ऊ) चे प्राचार्य श्री चव्हाण सर उपस्थित होते अध्यक्षस्थानी श्री वीर सर हे उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करून त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले कार्यक्रमाचे प्रास्ताविक रायगड गणित अध्यापक मंडळाचे परीक्षासमिती प्रमुख व मुंबई विभागाचे सहकार्य वाहक संतोष जाधव यांनी केले

पालक व विद्यार्थी यांनी परीक्षा विषयीचे मनोगत व्यक्त केले त्यामध्ये इयत्ता दहावीची गणित पारंगत परीक्षेत जिल्ह्यात प्रथम आलेली विद्यार्थिनी हिने स्पर्धा परीक्षेसाठी गणिताचे महत्त्व व इयत्ता दहावीसाठी पारंगत परीक्षेमार्फत मिळालेल योगदान हे सांगितले पालकांमधून भीमराव खेडकर यांनीही स्पर्धेच्या युगातील गणित आणि दैनंदिन जीवनावरती त्याचा होणारा परिणाम हे समजावून सांगत मंडळास आर्थिक सहाय्य देण्याचे आश्वासन दिले व तात्काळ दहा हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली त्यानंतर पालकांमधील व शिक्षकांमधील निरागसता आणि सध्याच्या युगातील गणिताचे महत्त्व याविषयी मोलाचे मार्गदर्शन कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. वीर सर यांनी केले .

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणित मंडळाचे माजी अध्यक्ष प्रकाश सोरटे यांनी केले कार्यक्रमास गणित प्रेमी शिक्षक घोडके सर शिंगरुत सर रोटे सर अशा शिक्षकांची उपस्थिती लाभली मंडळाचे अध्यक्ष दिलीप मोरे यांनीही मोलाचे मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या प्रायव्हेट हायस्कूल पेणच्या प्राचार्या सौ. अंजली जोशी यांनीही कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या आणि शेवटी सर्वांचे आभार मानत संतोष जाधव यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

---

### सफाळे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत

## मुख्यमंत्री युवा कार्य व प्रशिक्षण योजना मेळावा संपन्न

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ पालघर प्रतिनिधी**

**सफाळे :** ३ ऑक्टोंबर २०२४ रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सफाळे येथे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना रोजगार मेळावा अंतर्गत कौशल्य विकास विभागाद्वारे आयोजित मेळावा खालील मान्यवर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. रोजगारा मेळाव्यास कौशल्य विकास विभागाकडून समन्वयक करुणा वैद्य तर महाराष्ट्र उद्योजकता विकास मंडळाकडून स्वाती भोईर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान मेघराज शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी चंदुलाल घरत यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून सफाळे गावच्या सरपंच तनुजा कवळी , उपसरपंच राजेश ( बंटी ) म्हात्रे. पास्तळ आयटीआयचे प्राचार्य - अतुल राऊत , माहीम आय टी आय चे प्राचार्य लोकेश झाडे , आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त पत्रकार आणि लायन्स क्लबचे अध्यक्ष प्रमोद पाटील, ग्रामपंचायत कोरे सरपंच प्रदीप वर्तक, लायन्स क्लब माजी अध्यक्ष दिनकर वर्तक, प्रमोद राऊत आदी उपस्थित होते. त्यांनी आपापल्या परीने आलेल्या लाभार्थी यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य नितीन वर्तक यांनी केले तर सूत्रसंचालन पंकज अरूण म्हात्रे यांनी केले , या रोजगार मेळाव्याला अंदाजे ३०० उमेदवार यांनी उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमात सात कंपनीचे प्रतिनिधी यानी आपले स्टॉल तसेच सपोर्ट संस्थेचे - आगरवाडी आणि उद्योजकता विकास विभागाचे स्टॉल लावण्यात आलेले. उपस्थित रोजगारीसाठी आलेल्या युवकांना स्पॉट इंटरव्यू घेऊन लगेच कंपनीमध्ये त्यांना नियुक्त पत्र दिले तर काही लोकांनचा बायोडाटा घेऊन कंपनी नंतर त्याना बोलणार आहे असे सांगितले. हा रोजगार मेळावा यशस्वी होण्यासाठी संस्थेची निदेशक किरण बारी ,संजय गहला , भागेश पाटील ,दिशा पाटील , गणेश घरत आणि स्वाती पाटील यांनी मदत केली

---

## सुरक्षा रक्षकांच्या संघर्ष लढ्याला यश !

### सुरक्षा रक्षकांच्या गणवेशाचा रंग निश्चित !

### आता खाकी रंगाच्या गणवेषात दिसणार सुरक्षा रक्षक !



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

**मुरबाड दि.४ :** राज्यातील खाजगी सुरक्षा रक्षक मंडलातील सुरक्षा रक्षकांच्या गणवेषाचा रंग निश्चित करण्यात आला असुन कामगार विभागाच्या अख्यारित्यतील सुरक्षा रक्षक मंडळाच्या सुरक्षा रक्षकांचा गणवेषाचा रंग ब्रहन्मुबंई महानगरपालिकेच्या सुरक्षा रक्षकांच्या गणवेषा प्रमाणे खाकी रंगाचा ठेवण्याची मान्यता देण्यात आली असुन टोपीचा रंग निळा व त्यावर सुरक्षा रक्षक मंडळाचा लोगो व नाव चिन्हाकिंत करण्यात आले आहे.असा आदेश १ आक्टोबर रोजी कामगार मंत्रालय महाराष्ट्र शासनाद्वारे काढण्यात आला आहे.

या आदेशामुळे महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक एकता संघर्ष समिती समूहाच्या संघर्षाच्या लढ्याला यश आले असुन ,मुरबाड, शहापूर,ठाणे, पुणे, मुंबई, सह संपूर्ण महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक समूहाने आनंद व्यक्त करत एकमेकांना पेढे भरवत जल्लोष केला आहे.

१९८७ पासून महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यातील सुरक्षारक्षकांना नीला रंगाची वर्दी असल्यामुळे शासकीय व प्रायव्हेट आस्थापनांमध्ये प्रायव्हेट एजन्सी च्या तुलनेत सुरक्षारक्षक उठाव रुबाबदार दिसत नव्हता त्यामुळे ही शासकीय आस्थापनांची शासनाकडे मागणी होती व त्यासाठी शहापूर मुरबाड महाराष्ट्र राज्य एकता संघर्ष समिती समूहाने व इतर सर्व संघटना च्या एकमताने सदर विषयी मार्गी लावला असल्याची प्रतिक्रिया दिली.

विशेष म्हणजे मोबाईल वाटसप ग्रुप वर ह्या लढ्या संबधित नियोजन केले जात होते. प्रकाश हरड, विजय शेलवले , अनिल शेलवले, नितीन चौधरी ,शैलेश इसामे, संदीप विशे, अरविंद कोकणी, वालिंबे, पवार ,पाटोळे, शिंदे ,भोईर, फुलोरे ,गवई, गायकर ,दांडकर, सोनावले, डोहळे सहसंपूर्ण महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक बांधवांनी विशेष मेहणत घेतली आहे.

---

जाहीर नोटीस

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कल्याण यांचे कार्यालय; कल्याण**

जा.क्र. फौजदारी/ जन्म मृत्यु नोंद /टि-६/ एसआर-५७७/२०२४ दि. ०६/०९/२०२४

**प्रति.**

**१) रामदास अनंता भोईर राहणार,**
**मु.पळसोळी. पो. वेहळे .............................. अर्जदार**

**विरुध्द**

**२) ग्रामपंचायत पळसोळी,**
**पो. वेहळे ता. कल्याण जि.ठाणे ....................सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे :-

४०. उपरोक्त अर्जदार यांची मुलगी **ज्योत्सना रामदास भोईर** यांचा जन्म दिनांक **११-०३-१९९७** रोजी त्यांचे ता. कल्याण, जि. ठाणे. येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्माची नोंद **ग्रामपंचायत पळसोळी पो. वेहळे ता. कल्याण जि. ठाणे** दफ्तरी करुन जन्म दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तीक कारणांसाठी त्यांच्या मुलीच्या जन्म दाखल्याची आवश्यकता आहे.

७३. उशीरा स्वताची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडुन आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास अर्ज क्रमांक ०६-०८-२०२४ दाखल केला आहे.

७४. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी; वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे त्यांच्या मुलीचा जन्म नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे २३/०९/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली. हुकुमावरुन

**तहसील कार्यालयाचा शिक्का**

**सही /-**
**तहसिलदार; कल्याण**
**कार्यकारी दंडाधिकारी, कल्याण**

---



## जाळ्यात अडकलेल्या अजगराची सुटका

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

**सफाळे :** पालघर येथील सफाळे पूर्व तांदूळवाडी रोड भगाली पाडा - नवघर नाका, नायरा पेट्रोल पंप समोर, राहणारे मितेश पारधी यांच्या घराच्या आवारास भटक्या जनावरांन पासून संरक्षणासाठी लावलेल्या नायलॉनच्या जाळीत एक मोठा अजगर अडकून राहीला आहे. याबद्दल सर्पमित्र निलेश मंडळ नंदाडे सफाळे पूर्व यांना भ्रमणध्वनी द्वारे अंदाजे सकाळी १० नंतर माहिती मिळाली. या अनुषंगाने सफाळे सर्पमित्र गृपचे निलेश मंडळ यांनी भगाली पाडा येथील मितेश पारधी यांच्या घराच्या आवारात संरक्षण करण्यासाठी लावलेल्या नायलॉनच्या जाळयात, सरपटणारा प्राणी - अजगर जातीच सर्प आढळून आला. सदर अजगराची नायलॉन जाळीतून त्याला कोणत्याही प्रकारची इजा होऊ न देता, हाताने त्याची सुखरूप सुटका केली.

अजगराची अंदाजे ५ फुटापेक्षा जास्त लांबी होती. सदर प्राण्यास एका प्लास्टिक गोणीत भरुन , वनविभागाच्या सुरक्षित जंगलात सोडले आहे. या बद्दल त्या भागातील लोकांकडून, सर्पमित्र नितेश मंडळ याचे आभार मानण्यात येत आहे.

---

दैनिक जीवनदीप वार्ता

**नवरात्री निमित्त विशेष आवाहन**



नवरात्र हा एक असा कालखंड आहे ज्या कालखंडातील सर्व नऊ दिवसांपैकी प्रत्येक दिवस हा आपण देवीमातेच्या नऊ वेगवेगळया अवतार तसेच रुपांना अर्पित करत असतो. हा उत्सव साजरा करताना आपण प्रत्येक दिवशी जो रंग महत्वाचा त्याच रंगाचे वस्त्र, कपडे परिधान करतो. आपणही असेच रंग परिधान करुन नवरंगात रंगला असाल तर आपल्या ग्रुपचे फोटो नाव व पत्त्यासह दै. जीवनदीप वार्ताच्या खालील ई मेल आयडीवर पाठवावेत आम्ही त्यास नक्कीच प्रसिध्दी देऊ

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com
news.thanejeevandeep@gmail.com

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी